महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एमएमटीसी हाऊस, तळमजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , बान्द्रा कुर्ला संकुल,
बान्द्रा (पूर्व),मुंबई ४०० ०५१ .

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५२ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

बैठक स्थळ :- सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई

दिनांक. :- ०४.०९.२०१९

वेळ :- सकाळी ११.०० वा.

## मंडळाच्या ५२ व्या बैठकीची विषयसूची

**(दिनांक ०४.०९.२०१९)**

अनुक्रमणिका


| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मंडळाच्या दिनांक ०३.०६.२०१९ रोजी संपन्न ५१ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | ०४ |
| २. | मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलींच्या विवाहासाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबत. | ०५-०७ |
| ३. | बांधकाम कामगाराच्या मुलाच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी रू. २५०००अर्थसहाय्य देणे तसेच पहिल्या दोन आपत्यांऐवजी कोणत्याही दोन आपत्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत | ०८-१० |
| ४. | प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेतील सभासदाशिवाय वय वर्षे ४० ते ६० वयोगटीतील बांधकाम कामगारांना पेन्शन मिळण्याबाबत LIC कडून प्रस्ताव मागविणेबाबत विचारविनीमय करणेबाबत | ११-१५ |
| ५. | मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण (RPL) योजना राबविणेबाबत | १६-१९ |
| ६. | मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणी मध्ये ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश करण्याबाबत | २०-२२ |
| ७. | सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा आढावा सादर करणेबाबत | २३-३० |
| ८. | मावळ तालुक्यात तळेगाव जि. पुणे येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कार्यालय सुरु करण्याबाबत.. | ३१-३२ |
| ९. | कामगार आयुक्तालय, विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयाकरिता वाहन खरेदी बाबत | ३३-३६ |
| १०. | रॉयल एक्झॉटिका, एस. व्ही.जी बिल्डर्स यांचे बांधकाम प्रकल्पावर कोंढवा बु. ता. हवेली जि. पुणे दि. २९. ०६. २०१९ रोजीची दुर्घटनेच्या मृत्यू पावलेल्या अनोंदित बांधकाम कामगारांच्या वारसांना विशेष बाब स्वरुपात अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.. | ३७-३९ |

| | | |
|---|---|---|
| ११. | मे. एमएमटीसी लिमिटेड, बीकेसी यांच्या मालकीच्या इमारतीतील तळ माळ्यावरील अंदाजे १४०० स्क्वेअर फुट- कारपेट जागा तात्पुरत्या स्वरुपात (मंडळ मुख्यालयाचे त्याच इमारतीतील ५ व्या मजल्यावरील कार्यालय तयार होईपर्यंत) भाडे तत्वावर घेण्याबाबत.. | ४०-४१ |
| १२. | मे. कॅस्कॉम इन्फो सोल्युशन, नाशिक यांच्या नियुक्तीला मंडळाच्या संकेतस्थळाच्या देखभालीसाठी १ वर्षाची मुदतवाढ देण्याकरिता | ४२ |
| १३. | राज्यशासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा नियम मंडळाच्या अधिपत्याखालील पदांना लागू करण्याबाबत | ४३-४४ |
| १४. | मंडळाचे वार्षिक लेखे व विवरण पत्राच्या नमुन्यास मान्यता देणेबाबत. | ४५-४८ |
| १५. | मंडळाकडे जमा उपकर निधीच्या गुंतवणुकीचा त्रैमासिक अहवाल सादर करणेबाबत. | ४९-५२ |
| १६ | आयत्या वेळेचे विषय | ५३-५६ |

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.०३.०६.२०१९ रोजी संपन्न ५१ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५१ वी बैठक शुक्रवार दिनांक ०३.०६.२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. सह्याद्री अतिथिगृह, मुंबई, येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा. अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. मंजूर इतिवृत्तांताची प्रत मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्यांना दि.०३.०७.२०१८ रोजी ई-मेलद्वारे पाठवून बदल असल्यास सूचविणेबाबत कळविण्यात आले होते. सदर इतिवृत्त मंडळ सचिव यांनी बैठकीत वाचून दाखविले व काही बदल असल्यास तसे सूचविण्यास विनंती केली. मंडळाच्या दिनांक ०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(१)/२०१९ :- मंडळाच्या दिनांक ०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०२ :- मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहासाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या विविध बैठकांमध्ये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे संदर्भात ठराव पारित करण्यात आले आहेत. मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार योजना मंजूरीचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर करून शासन मान्यतेअंती योजनेचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांना देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मंडळस्तरावरून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी एकूण २९ विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.३०,०००/- इतके अर्थसहाय्य मंडळामार्फत दिले जाते. माहे मार्च २०१९ पर्यंत सदर योजनेंतर्गत १७५३ बांधकाम कामगारांना लाभ अदा करण्यात आलेले आहे.

नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता शैक्षणिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, मुलांच्या विवाहकरीता कोणतीही योजना राबविली जात नाही. नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी व कामगार संघटनांकडून मंडळास सादर निवेदनामध्ये बांधकाम कामगाराला मिळणारे अल्प वेतनामधून दैनंदिन खर्च भागवून मुलीचे विवाह करताना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब विचारात घेता नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. मंडळामार्फत आयोजित विविध कल्याणकारी योजनांच्या वर्धा, अकोला येथील लाभ वाटप कार्यक्रमामध्ये सुध्दा यासंदर्भात मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

मंडळामार्फत सन २०१८ मध्ये राजस्थान या राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला भेट दिली असता सदर भेटीमध्ये मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली असता राजस्थान या राज्यात नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनधी, कामगार संघटना इत्यादींकडून प्राप्त विनंतीस अनुसरून खालीलप्रमाणे योजना मंजूरीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता.

योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

| अ. क्र. | योजना व योजनेच्या अटीशर्ती | सादर करावयाचे कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या लग्नाकरीता अर्थसहाय्य | |
| २. | नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार असावा. | ओळखपत्र/नुतनीकरण |
| ३. | एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देय राहील. | ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलामध्ये मुलीच्या नावाची नोंद असावी. |
| ४. | मुलीचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. | ओळखपत्रामध्ये जन्म तारखेची नोंद असावी. |
| ५. | मुलीचे शिक्षण कमीत कमी १० वी पर्यंत असावे | १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र |
| ६. | मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा सादर करावा. | लग्नपत्रिका/ लग्नाचे फोटो/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र |

उक्त बाबीच्या अनुषंगाने प्रस्तावित मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबतची योजना मान्यतेकरीता सादर करण्यात आली होती.

सदर बैठकीत मा. मंत्री महोदय कामगार विभाग यांनी असे सूचित केले की, प्रस्तावित योजनेच्या अटी शर्तीमधून शिक्षणाची अट वगळण्यात यावी तसेच मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा म्हणून विवाह नोंदणी प्रमाणपत्र घेण्यात यावे. सदर सुचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला

**ठराव क्रं. ५२(२)/२०१९ :- नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबतच्या योजनेस मान्यता प्रदान**

करण्यात येत आहे. सदर योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे.
२. मुलीचा विवाह संपन्न झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.
३. नोंदीत बांधकाम कामगाराच्या ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलात मुलीच्या नावाची नोंद असावी.
४. लग्न झालेल्या मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये. याबाबत वयाचा पुरावा (ओळखपत्रातील नोंद/ जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ बोनाफाईड सर्टिफिकेट/) सादर करावा.

सदर निर्णयानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०३ :- बांधकाम कामगाराच्या मुलाच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी रू.२५,०००/- अर्थसहाय्य देणे तसेच पहिल्या दोन अपत्यांऐवजी कोणत्याही दोन अपत्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या विविध बैठकांमध्ये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे संदर्भात ठराव पारित करण्यात आले आहेत. मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार योजना मंजूरीचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर करून शासन मान्यतेअंती योजनेचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांना देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मंडळ स्तरावरून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी एकूण २९ विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. शैक्षणिक अर्थसहाय्याच्या योजनांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांच्या ०२ पाल्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. सदर योजनांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्याकरीता शासनमान्य पदविकेमध्ये प्रती शैक्षणिक वर्षी रू.२०,०००/- आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये प्रति शैक्षणिक वर्षी रु. २५,०००/- योजनेचा लाभ दिला जातो. सार्वजनिक आरोग्य विभागाने घोषित केलेल्या ०५ गंभीर आजारांवरील उपचाराकरीता रू.१.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते, अटल बांधकाम कामगार आवास योजनेंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना रू.२.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य घरबांधणीकरीता देण्यात येते. सदर योजनांमध्ये अंशत: बदल करण्याबाबत लोकप्रतिनिधी, बांधकाम कामगार, कामगार संघटना इत्यादींकडून मागणी होत आहे. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.

अ. मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये पदव्युत्तर शिक्षणासाठी लाभ दिला जात नाही. बांधकाम कामगाराच्या मुलाच्या शिक्षणासाठी पदव्युत्तर पदविकेप्रमाणे पदव्युत्तर पदविकेसाठी रू.२५,०००/- अर्थसहाय्य देणेबाबत सुधारणा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ब. नोंदीत बांधकाम कामगाराच्या दोन पाल्यांना अर्थसहाय्य देणेबाबत मंडळाने योजना मंजूर केली आहे. याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून कोणत्या ०२ पाल्यांना (पहिला व दुसरा/ पहिला व तिसरा/ दुसरा व तिसरा इत्यादी) अर्थसहाय्य देण्यात यावे.याबाबत मंडळास विचारणा केली असता माहे डिसेंबर २०१८ मध्ये पहिल्या ०२ अपत्यांच्या शिक्षणासाठी अर्थसहाय्य देण्यात यावे असे क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले

होते. तथापि, याबाबत बांधकाम कामगार/कामगार संघटना इत्यादींकडून पहिल्या ०२ अपत्यांऐवजी कोणत्याही ०२ अपत्यांना लाभ देण्यात यावा अशी मागणी होत आहे.

क. नोंदीत बांधकाम कामगारांना ०५ गंभीर आजारांवरील उपचारासाठी रू.१.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते. सदर ०५ गंभीर आजारामध्ये रक्ताचा कर्करोग या आजाराचा समावेश आहे याऐवजी सर्व कर्करोगांचा समावेश करावा, अशी मागणी होत आहे.

ड. अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) मध्ये नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्राप्त होणारे अर्थसहाय्य रू.२.५० लक्ष शिवाय मंडळाकडून रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येत. याबाबत लाभ शहरी भागात म्हाडाच्या योजनेत लाभ मिळतो यात बदल करून कामगाराच्या स्वत:च्या जागेवर अथवा इतर गृहप्रकल्पांमध्ये त्यांना ०२ लाख अर्थसहाय्य मिळावे अशी मागणी करण्यात येत आहे.

मंडळाकडे विविध कल्याणकारी योजनांपैकी उपरोक्त योजनातील बदलाबाबत करण्यात येत असलेल्या मागणीबाबत उचित निर्णयार्थ प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर चर्चा करताना नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्याच्या पदव्युत्तर पदविकेकरीता प्रतिवर्ष रू.२५,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यास सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. नोंदीत बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांनाच शैक्षणिक अर्थसहाय् देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला. मंडळ अध्यक्षांनी नोंदीत बांधकाम कामगारांना पाच गंभीर आजारांवरील उपचारासाठी रू.१.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात येते. सदर गंभीर आजारामध्ये रक्ताचा कर्करोग या गंभीर आजाराचा समावेश आहे. तथापि, यात बदल करून गंभीर आजारांमध्ये सर्व कर्करोगांचा समावेश करण्यात यावा असे सूचित केले. सदर सूचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) या योजनेकरीता मंजूर निकषानुसारच कार्यवाही करणे योग्य राहील असाही निर्णय घेण्यात आला व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(३)/२०१९ :- मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला**

**१. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराच्या मुलाच्या शिक्षणासाठी ,पदव्युत्तर पदविकेप्रमाणे पदव्युत्तर पदवीसाठी सुध्दा प्रति वर्ष रू.२५,०००/- अर्थसहाय्य देण्यात यावे.**

२. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन पाल्यांनाच शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्यात यावा.

३. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना देण्यात येणाऱ्या गंभीर आजाराच्या यादीत समावेश असणाऱ्या रक्ताचा कर्करोग ऐवजी सर्व कर्करोगांचा समावेश गंभीर आजारात करण्यात यावा व रू.१.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे.

उपरोक्त निर्णयाला अनुसरून प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०४ :- प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेतील सभासदाशिवाय वय वर्षे ४० ते ६० वयोगटातील बांधकाम कामगारांना पेन्शन मिळण्याबाबत LIC कडून प्रस्ताव मागविणेबाबत विचारविनिमय करणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या माहिती व मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता.

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे कळविण्यात आलेली आहे:

अ) **लाभार्थी पात्रता :-**

- असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्षे १८ ते ४० दरम्यानचा कामगार
- मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी
- कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा

ब) **आवश्यक कागद पत्रे :-**

- आधार कार्ड
- बँक पासबुक (राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)
- भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

क) **योजनेचा लाभ :-**

- वय वर्षे ६० पूर्ण केल्यानंतर दरमहा रु. ३०००/-मानधन
- लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार
- लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

केंद्र शासनाचे कामगार व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेत नोंदणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्षे १८ ते ४० दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.

२. १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीने रु.५५ ते २००/- पर्यंत प्रतिमाह (वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत)अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची ६० वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान ३०००/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

३. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.

४. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

क) आधार कार्ड

ख) बँक पासबुक ( राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)

ग) भ्रमणध्वनी ( OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा )

घ) पहिले मासिक अंशदान(रोख स्वरुपाने ,वयानुसार)

५. नागरी सुविधा केंद्रामार्फत बँक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती-पत्नी( व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.

६. लाभार्थींच्या वयानुसार अंशदानाची रक्कमेची गणना ऑनलाईन सिस्टीमद्वारे करण्यात येईलपहिल्या मासिक ,पात्र लाभार्थींच्या वयानुसार ,योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी .) अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेलप्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे प्रपत्र – २ सोबत जोडले आहे .( अंशदानाची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून .लाभार्थीस देण्यात येईल

७. दुस-या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातून परस्पर कपात (auto-debit) करण्यात येईल.

१. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

९. पहिले मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी करण्यात येईल.

१०. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस प्रधानमंत्री श्रम योगी मानधन कार्ड व स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

११. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बँक खात्यातून परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

१२. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अदा करण्यात येईल.

- केंद्र शासनच्या कामगार विभागामार्फत ३१ मार्च २०१९ अखेर दोन कोटी लाभार्थीचा योजनेमध्ये सहभागी करण्याचा लक्षांक ठेवण्यात आलेला असल्याने महाराष्ट्र राज्यामध्ये ३१ मार्च २०१९ अखेर, राज्यात असणारे सुमारे ४६००० नागरी सुविधा केंद्राकडून,प्रत्येकी किमान १०० या प्रमाणे, लाभार्थीची नोंदणी करणे आवश्यक आहे.
- मंडळाच्या अध्यक्षांनी कामगारांच्या संघटनांबरोबर व कामगारांसोबत बैठकीचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात यावे. आपल्या अधिनस्थ कामगारांना योजनेबाबत माहिती देण्यात यावी व जास्तित जास्त कामगारांनी सदरचे योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन, जनजागृती करण्यात यावी.
- प्रधान मंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कॅबिनेट सेक्रेटरी/केंद्र शासन यांनी आयोजित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपरोक्त निर्देश दिले आहेत की, राज्यांच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या अधिका-यांना सदर योजनेत अधिकाअधिक नोंदणी करण्याबाबत अवगत करावे तसेच सदर मंडळाद्वारे आपल्या मंडळातील नोंदित कामगारांचे प्रथम वर्षाचे अंशदान भरण्यात यावे असे निर्देश प्राप्त झालेले आहेत.
- मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांच्या दि.२६.०२.२०१९ रोजीच्या पत्रातील उपरोक्त निर्देश विचारात घेता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजना लागु करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम काम्मगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील व उपरोक्त लाभार्थी पात्रता धारण करणाऱ्या बांधकाम कामगारांना सदर योजना लागु करण्यास मान्यता प्रदान करावी.

२. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० वयोगटातील लाभार्थ्यांने भरावयाची रु.५५/- ते २००/- पर्यंत प्रति महा (वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत) भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम १ वर्षाची अंशदान मंडळाकडुन भरण्यात यावी व तदनंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यातून अंशदानाची रक्कम परस्पर कपात करण्यात यावी.

३. ०१ वर्षानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यातू दरमहा परस्पर अदा केलेल्या अंशदानाच्या रक्कमेचा परतावा (Reimursement) मंडळाकडून करण्यात यावी.

४. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त कामगारांनी घ्यावा, योजनेमध्ये सहभागी व्हावे याकरिता व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करून जनजागृती करण्यास व त्यावरील खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करावी.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील पात्र लाभार्थ्यांना सदर योजना लागू करण्यात यावी. पात्र बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी ०१ वर्षाचा अंशदान मंडळाकडून अदा करण्यात यावे. सदर अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करण्यात यावी. सदर योजनेची माहिती नोंदीत बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्यासाठी पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शवली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव ५०(४)/२०१९ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी पात्र बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (PM-SYM) योजना लागू करण्यात यावी. बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम ०१ वर्षाचे अंशदान मंडळाने नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करावे. सदर योजनेची माहिती सर्व बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्याकरीता आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

उक्त बाबींच्या अनुषंगाने प्रधानमंत्री श्रमयोगी योजनेतील सभासदाशिवाय वय वर्षे ४० ते ६० वयोगटातील बांधकाम कामगारांना पेन्शन मिळण्याबाबत LIC कडून प्रस्ताव मागविण्याबाबत मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

सदर विषयाबाबत चर्चा करताना मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांनी वयं वर्षे १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीच्या संख्येचा तपशील व वयं वर्षे ४० ते ६० वयोगटातील लाभार्थीच्या संख्येचा तपशिल संकलित करण्यातबाबतच्या सूचना दिल्या व तोपर्यंत सदर विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे सूचित केले. सदर सूचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(४)/२०१९ :- प्रधानमंत्री श्रमयोगी योजनेचा लाभ वय वर्षे १८ ते ४० या वयोगटातील नोंदीत बांधकाम कामगारांना मिळत आहे. या नोंदीत बांधकाम कामगारांशिवाय वय वर्षे ४० ते ६० वयोगटातील बांधकाम कामगारांना पेन्शन योजनेचा लाभ दयावयाचा असल्यास मंडळाकडे नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० वयोगट व ४० ते ६० वयोगटातील लाभार्थ्यांचा डेटा उपलब्ध करण्यात यावा व तदुनंतर LIC कडून प्रस्ताव मागविण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०५ :- मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण (RPL) योजना राबविणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण योजना राबविणेकरीता मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ व दि.०१.०३.२०१९ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेले आहेत.

मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(५)/२०१९: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेमार्फत देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाच्या बाबींमध्ये बांधकामाच्या व्याख्येत नव्याने समाविष्ट २१ कामासंबंधित बाबींचा समावेश करण्यात यावा तसा सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेकडून मागविण्यात यावा व सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(६)/२०१९ :- शासन मान्यतेने नियुक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर, असेसिंग बॉडीज सोबत करण्यात आलेल्या करानाम्याची मुदत पुढील ०१ वर्षाकरीता वाढविण्यात यावी, यापुढील RPL प्रशिक्षणाच्या व्यवस्थापनाकरीता मंडळ स्तरावरुन PMC (Project Management Consultant) ची नियुक्ती करण्यात यावी. मंडळ स्तरावर PMC (Project Management Consultant) ची नियुक्ती होईपर्यंत महारेराकडून प्राप्त प्रस्तावानुसार १०,००० नोंदीत बांधकाम कामगारांना महारेरा मार्फत RPL चे प्रशिक्षण केंद्र शासनाच्या प्रचलित निकषानुसार देण्यात यावे. PMC (Project Management Consultant) ची नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला होता.**

मंडळाच्या उपरोक्त दि.०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत पारित ठरावानुसार मंडळ स्तरावर PMC (**Project Management Consultant**) ची नियुक्ती होईपर्यंत महारेराकडून प्राप्त प्रस्तावानुसार मुंबई, पुणे, ठाणे व नागपूर या ०४ जिल्ह्यातील नोंदीत बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाकरीता महारेरा या संस्थेसोबत करारनामा करण्यात आलेला आहे व प्रशिक्षणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५. महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी यांचेकडील पत्र क्र. जा.क्र.MSSDS/MC/D-२०/२०१८/८४६-८४८ दि.२८.०८.२०१९ (प्रत संलग्न) च्या पत्रान्वये बांधकाम क्षेत्रातील ०३ लाख बांधकाम कामगारांना RPL अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाकडून निर्गमित मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (NSDC) च्या सहयोगाने Recognition of Prior Learning (RPL) हा उपक्रम राबविला जात आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या पंतप्रधान कौशल्य विकास योजना २.०० या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये बांधकाम क्षेत्रातील कामगारांना RPL अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबत प्रस्तावित केले आहे. मंडळामार्फत महारेरा या संस्थे सोबत झालेल्या करारानुसार १०,००० बांधकाम कामगारांना RPL अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत राबविण्याचे प्रगतीपथावर आहे. याशिवाय अल्पसंख्याक विकास विभागाचा कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम सुध्दा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत राबविण्याचे प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र शासन कौशल्य विकास उद्योजकता विभागाच्या शासन निर्णय क्र.कौविउ-२१०८/प्र.क्र.१२४/अभियान-१ दि.२०.०८.२०१९ (प्रत संलग्न) अन्वये राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत राबविण्यात येणा-या कौशल्य विकास व उद्योजकता विकास (Skill & Enterpreneurship Development) तसेच क्षमता वृध्दीगत (Capacity Building) करण्यासंदर्भात योजनांचे एकसुत्रीकरण करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये मुद्दा क्र.४ नुसार प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत राबविण्यास संबंधित विभाग इच्छुक असल्यास प्रशिक्षण व मूल्यमापन शुल्काची अनुज्ञेय रक्कम महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) कडे २% प्रशासकीय शुल्कासह आगाऊ जमा करणे आवश्यक राहील असे नमूद आहे.

नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित प्रशिक्षण कार्यक्रमा अंती बांधकाम क्षेत्रातील ०३ लाख कामगारांना RPL अंतर्गत प्रशिक्षण देवून लाभार्थ्यांच्या कौशल्यवृध्दीतून त्यांना त्यांची बांधकाम क्षेत्रातील उपक्रमशिलता तसेच नाविन्यता याद्वारे उत्पादकता वाढवता येईल. तसेच याद्वारे मिळणाऱ्या वाढीव मिळकतीद्वारे त्यांचे राहणीमान उंचवण्यास मदत होईल.

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास इच्छुक प्रशिक्षण संस्थांना सुचीबध्द करण्याकरीता या कार्यालयामार्फत अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) प्रसिध्द करण्यात आलेला आह. तसेच या अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) मध्ये बांधकाम क्षेत्रातील ३ लाख कामगारांना RPL अंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) च्या सहयोगाने कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरीता प्रस्तावित आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) मार्फत राबविण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खर्च अपेक्षित असून प्रती लाभार्थी खर्च रु.११,७९८/- इतका असेल.

| Sr. No | Selected Job Roles (SSC) | Cost per Candidated (INR) | No. of Hours of Training | Target Youth to be trained | Total Cost (INR in Crore) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Orientation (Mobilization, Branding and Publicity) | 1400 | 12 | 300000 | 42.00 |
| 2. | Bridge Training | 3175 | 68 | 300000 | 95.27 |
| 3. | Employability Skill Training | 1868 | 40 | 300000 | 56.04 |
| 4. | Basic Tool Kit | 500 | - | 300000 | 15.00 |
| 5. | Refreshmnet | 100 | - | 300000 | 3.00 |
| 6. | Assessment | 975 | - | 300000 | 29.25 |
| 7. | Wage Loss/ Reward Money/ Development Activities/ welfare of the workers. | 3780 | - | 300000 | 113.40 |
| | Per candidate Total | 11,798 | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Cost | | | | |
| | Total Cost | | | | 353.96 |
| Administration Charges @ 2% of Total Cost (Online & offline monitoring, web portal use and maaintainenece, etc) | | | | | 7.08 |
| Total Project Cost | | | | | 361.04 |

तरी, बांधकाम क्षेत्रातील ३ लाख कामगारांना RPL अंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) च्या सहयोगाने कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरीता उक्त प्रमाणे आवश्यक निधी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीस वर्ग केल्यास या कार्यक्रमाची तात्काळ अंमलबजावणी करणे सुलभ होईल, असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगार कोणकोणत्या कामावर काम करतात, नोंदीत बांधकाम कामगारांवरील स्त्री व पुरुष कामगारांची विगतवारी, कामगारांचे पाल्य व त्यांचे वयोगट याबाबतचा डेटा तयार करण्यात यावा त्यानुसार प्रशिक्षणाचे कोर्सेस ठरविणे योग्य राहील. सदर सूचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. मा. मंत्री महोदय,कामगार विभाग यांनी असेही निर्देश दिले की, सदर प्रशिक्षण कोर्सेसची निवड करताना व प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देणेबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) या संस्थेची मदत घेता येईल. तूर्तास सदर विषय स्थगित ठेवण्यात यावा यास सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(५)/२०१९ :- नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांपैकी वेगवेगळया बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांची, स्त्री व पुरूष कामगारांची संख्या, पाल्यांचे वयोगट व संख्या याबाबतची माहिती एकत्र करावी व मंडळाच्या आगामी बैठकीत स्वतंत्र विषय सादर करावा. तूर्तास सदर विषय स्थगित ठेवण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

विषय क्र.०६ :- मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीमध्ये ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश करण्याबाबत

मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटूंब कल्याण विभागांतर्गत मे. एच.एल.एल. लाईफकेअर प्रा.लि. या कंपनीकडून प्राप्त प्रस्तावाला अनुसरून मंडळाच्या दि.२४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अनुसरून मंडळाच्या बैठकीत पारित ठरावानुसार शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सदर संस्थेसोबत रीतसर करारनामा करून दि.०१.०३.२०१९ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले होते व दि.३०.०५.२०१९ च्या पत्रान्वये मंडळाकडील सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीबाबत नियुक्त संस्थेने व जिल्हा कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

मे. एच.एल.एल. लाईफकेअर प्रा.लि. या कंपनीकडून सर्व साधारण कामगारांकरीता खालीलप्रमाणे आरोग्य तपासणी करण्यात येते.

| | |
|---|---|
| 1. | Physical Examination (Head to Bottom) |
| 2. | CBC |
| 3. | Blood Sugar |
| 4. | Liver Function Test |
| 5. | Renal Function Test |
| 6. | Lipid Profile |
| 7. | Malaria Parasite |
| 8. | ESR |
| 9. | Urine Test |
| 10. | Occupational History |
| 11. | Social History |
| 12. | Family History |
| 13. | Lung Function Test |
| 14. | Audio Screening Test |
| 15. | Vision Screening |
| 16. | Snellen General Employees |
| 17. | Fit for employment Certificates |

| | |
|---|---|
| 18. | Individual Reports |
| 19. | Excutive Company Reports |
| 20. | Baseline Medicals-2 X Audio Test |
| 21. | General medicals is done by- Occupational Health Nurse |
| 22. | Medicals is reviewed by- Occupational health Practitioner |

मे. एच.एल.एल. लाईफकेअर प्रा.लि. या नियुक्त संस्थेमार्फत दि.३१.०८.२०१९ पर्यंत खालील जिल्हयात नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | आरोग्य तपासणी कॅम्पची संख्या | आरोग्य तपासणी केलेल्या नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | बुलडाणा | ०१ | २६० |
| २. | जळगांव | ०२ | ४०९ |
| ३. | कोल्हापूर | ०४ | ३५४ |
| ४. | मुंबई शहर | १७ | १९०९ |
| ५. | मुंबई पूर्व | १६ | १५५७ |
| ६. | मुंबई पश्चिम | ११ | ११९१ |
| ७. | नागपूर | १९ | २६२४ |
| ८. | पुणे | ५९ | ५२०३ |
| ९. | सांगली | ०१ | १२० |
| १०. | वर्धा | ०२ | ८२ |
| | **एकूण** | **१३२** | **१३६०९** |

मे. एच.एल.एल. लाईफकेअर प्रा.लि. या संस्थेमार्फत दि.०८.०७.२०१९ रोजी आरोग्य तपासणीमध्ये ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. (प्रत संलग्न)

The breast screening test with I breast scan shall be conducted as per CGHS rate (Central Government Health Scheme)

| Sr. No. | Particulars | CGHS rate (Rs.) |
|---|---|---|
| 1. | Breast Screening test | 450.00 (X-ray |

| | | |
|---|---|---|
| | | Mammography/Ultrasound Mammography) |
| | Discount @ 10% from CGHS rate | 45.00 |
| | Total rate | 405/- |

उक्त बाबींच्या अनुषंगाने मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांकरीता आरोग्य तपासणीमध्ये ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

या विषयावर चर्चा करताना मंडळ अध्यक्षांनी सूचित केले की, नोंदीत बांधकाम कामगारांमध्ये स्त्री बांधकाम कामगारांचाही समावेश आहे. ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश आरोग्य तपासणी मध्ये केल्यास ब्रेस्ट कॅन्सर असणाऱ्या महिला बांधकाम कामगारांना वेळीच उपचार करणे योग्य राहील. याबाबत सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(६)/२०१९ :- मे. एच.एल.एल. लाईफकेअर प्रा.लि. या नियुक्त संस्थेमार्फत दि.३१.०८.२०१९ पर्यंत १० जिल्ह्यांमध्ये एकूण १३६०९ बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे, याची मंडळ नोंद घेत आहे. आरोग्य तपासणी मध्ये ब्रेस्ट कॅन्सर या तपासणीचा समावेश करण्यात यावा व सदर तपासणीकरीता रू.४०५/- एवढी अतिरिक्त रक्कम अदा करण्यात यावी, मंडळाच्या मान्यतेअंती सदर बदलाबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०७ :- सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाचा आढावा सादर करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत ठरावाअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच व सुरक्षा संच पुरविण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने राज्यातील बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दिनांक ०३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. दिनांक २२.११.२०१७ व २३.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर दोन योजना राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

शासन मान्यतेनुसार मंडळस्तरावर दि.२८.११.२०१७ पासून दि. २१.१२.२०१७ पर्यंतच्या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया अवलंबविण्यात आली व पात्र निविदांचे दर स्वीकृतीचा प्रस्ताव दि.२१.०३.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासनाच्या दि.०९.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये संस्था निश्चितीस मान्यता देण्यात आली. व दि. २४.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दर स्वीकृतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांच्या नियुक्तीस शासन व मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दि.३०.०५.२०१८ रोजी सदर दोन्ही पुरवठादार कंपनीसोबत करारनामा करूनमे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. व मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांना दि. १४.०६.२०१८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते.

मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीस सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली व अतिरिक्त संच वाटपाची संख्या व त्यानुसार मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरले व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(३)/२०१९ :- मंडळ स्तरावरून देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादार संस्थांनी दि.१९.०१.२०१९ पर्यंत सुरक्षा संच व अत्यावश्यक संच**

वाटपाबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. ज्या जिल्हयामध्ये अत्यल्प संच वाटप झालेले आहे किंवा अद्यापही संच वाटपास सुरूवात झालेली नाही त्या जिल्हयात प्राधान्याने वाटप करणेबाबत पुरवठादार संस्थांना सूचना देण्यात यावी. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वाटप करणे आवश्यक आहे. अतिरिक्त सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठयाची संख्या निश्चिती व त्यानुसार मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने दि.२८.०५.२०१९ रोजी शासन मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगोन शासनाने दि.०३.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मंडळाने सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाच्या संख्येबाबत पुरवठादाराशी विचार विनिमय करून त्याअनुषंगाने आढावा घेऊन वेळोवेळी पुरवठा आदेश निर्गमित करण्याबाबत निर्देशित केलेले आहे. शासनाच्या दि.०३.०६.२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरून पुरवठादार संस्थेकडून माहे मे २०१९ अखेर जिल्हा निहाय प्रत्यक्ष संचाचे वाटप व आगामी ०३ महिन्यात किती संच वाटप करणे शक्य असल्याबाबत अहवाल सादर करण्याबाबत दि.०७.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

दि.०७.०६.२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरून सुरक्षा व अत्यावश्यक संच पुरवठादार संस्थांनी अनुक्रमे दि.०९.०६.२०१९ व दि.१०.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये संच वाटपाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे सादर केला होता.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | संच | ३१ मार्च २०१९ अखेर सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार संख्या | माहे मे २०१९ अखेर वाटप | माहे जून २०१९ मधील प्रस्तावित वाटप | माहे जुलै २०१९ मधील प्रस्तावित वाटप | माहे ऑगस्ट २०१९ मधील प्रस्तावित वाटप | माहे जून ते ऑगस्ट २०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | B | C | D | E | F | G | H | I |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | अत्यावश्यक संच | १२७७३० | ११३५३८ | २३६००० | ३३२००० | ३३१९९९ | ९००००० |
| २. | मे. इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि. | सुरक्षा संच | १२७७३० | ११३५३८ | २३६००० | ३३२००० | ३३१९९९ | ९००००० |

शासनस्तरावरून विचारणा केल्याप्रमाणे माहे जून ते ऑगस्ट २०१९ या ०३ महिन्याच्या कालावधीत उपरोक्त ९,००,००० प्रमाणे एकूण १०,९३,५३८ एवढया संचाचे वाटप करण्याबाबत प्रस्तावित केले होते. उक्त आराखडयापैकी किती संच वाटपाचे आदेश द्यावेत याबाबत शासन मान्यतेकरीता दि.१०.०६.२०१९ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाच्या दि.१३.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील सर्व नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करणे आवश्यक असून वाटपाचा आढावा घेऊन वेळोवळी पुरवठा आदेश निर्गमित करण्याबाबतचे निर्देश दिले होते. शासनाच्या दि.१३.०६.२०१९ रोजीच्या पत्रातील निर्देशास अनुसरून व शासन मान्यतेस अधीन राहून १,८५,००० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्याबाबतचे पुरवठा आदेश दि.१४.०६.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आले होते.

शासनाच्या दि.१५.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाने सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपास ०१ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच, शासनाच्या दि.१३.०६.२०१९ रोजीच्या पत्रातील निर्देशान्वये ज्या जिल्हयांमध्ये सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप अत्यल्प झाले आहे त्याचा आढावा घेऊन माहे जून २०१९ करीता १,८५,००० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास दिलेल्या पुरवठा आदेशास, माहे जुलै २०१९ करीता २,६८,१४० व माहे ऑगस्ट करीता २,४९,५९० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास तसेच सर्व नोंदीत व जिवीत कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासनाच्या दि.१५.०६.२०१९ रोजीच्या शासन मान्यतेनुसार दि.०५.०८.२०१९ रोजी माहे जुलै २०१९ करीता २,६८,१४० सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरणारे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०८.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

*मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपास निवडण्यात आलेल्या संस्थेस माहे ऑगस्ट, २०१९ पर्यंत दोन्ही संचाचे वाढीव ७,०२,७३० संच वाटप करण्यास शासन मंजूरी देण्यात आलेली होती. तथापि, आजतागायत वाटप वितरण संख्या पाहता, दोन्ही संचाचे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रत्येकी सुमारे ५,०८,००० वाटप करण्यात आले आहेत. या संख्येत मूळ मंजूर २,२५,००० संख्येचा समावेश आहे. या वरून सुमारे २,८३,००० अतिरिक्त संच माहे ऑगस्ट २०१९ पर्यंत वितरीत करण्यात आले आहेत.*

*संच वाटपाच्या प्रगतीचा वेग पाहता संदर्भाधिन पत्रान्वये घालून दिलेले लक्षांक पूरण होणार नाही तथापि, संपूर्ण संच वाटपाची मुदत ऑगस्ट २०१९ पर्यंत असल्याने दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत विहीत पध्दतीने कमाल वितरण करून दोन्ही संच वाटप बंद करण्यात यावे.*

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०८.२०१९ रोजीच्या पत्रास अनुसरुन मंडळामार्फत दि.२०.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या तुलनेत ज्या जिल्हयामध्ये कमी प्रमाणात संच वाटप करण्यात आलेले आहेत अश्या जिल्हयात दि.३१.०८.२०१९ पर्यंत प्राधान्याने संच वाटप करण्यात यावे, तसेच संच पुरवठादार संस्थांना दि.३१.०८.२०१९ पर्यंत संच वाटपाबाबतचा जिल्हानिहाय तपशील दि.०५.०९.२०१९ पर्यंत मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे होते.

मे. गुनिना कमर्शियल प्रा.लि. मुंबई यांचे दि. २८.०८.२०१९ व मे. इंडो अलाईड प्रोटिन फुड्स प्रा.लि. मुंबई यांचे दि. २९.०८.२०१९ च्या पत्रान्वये, संच वाटपाबाबत येणा-या अडीअडचणी नमूद करुन संच वाटपास दि.३१.०८.२०१९ च्या पुढे मुदतवाढ मिळणेबाबत फेर विनंती करण्यात आली होती.

मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी त्यांच्या दि.,२४.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये नागपूर शहरातील बऱ्याच कामगारांना संच मिळाले नाही, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या दक्षिण पश्चिम मतदान संघातील बहुतांस

कामगारांना संच मिळाले नाहीत. त्याकरीता दि. ०३.०९.२०१९ रोजी गजानन नगर, प्रियंका वाडी, प्रभाग क्र. १६ क येथे संच वाटपाचे कॅम्प आयोजित करण्यात यावेत असे सुचित केले होते. याशिवाय, मंडळामार्फत आयोजित विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटप कार्यक्रमातही लोकप्रतिनिधींनी त्यांच्या क्षेत्रात संच वाटपाबाबत मागणी नोंदविलेली आहे.

सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत मा. मंडळ अध्यक्ष व लोकप्रतिनिधींची मागणी तसेच पुरवठादार संस्थांनी सादर केलेल्या संच वाटपातील विलंबाबतच्या अडीअडचणी तसेच माहे ऑगस्ट २०१९ महिन्यात काही जिल्हयात झालेली अतिवृष्टी या बाबी विचारात घेता संच वाटपाकरीता दि. ३१.०८.२०१९ पासून पुढे मुदतवाढ देण्याबाबत दि.३०.०८.२०१९ रोजी शासन मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाच्या दि.३१.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटपास दि.१५.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

दि.०२.०९.२०१९ पर्यंत सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबतचा जिल्हा निहाय तपशील मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत करण्यात आलेली उपरोक्त कार्यवाही मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. याबाबत मंडळ स्तरावरून देण्यात आलेले पुरवठा आदेश, संच वाटप, अतिरिक्त संच वाटपास शासन मान्यता, शासन स्तरावरून संच वाटपाकरीता दि.३१.०८.२०१९ पर्यंत देण्यात आलेली मुदत व दि.१५.०९.२०१९ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(७)/२०१९ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.**

१. **मंडळाच्या दि.०१.०३.२०१९ रोजीच्या ठरावास अनुसरून सर्व नोंदीत बांधकाम सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठयास मान्यता देणेबाबत शासनास दि.२८.०५.२०१९ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला.**
२. **शासनाच्या दि.०३.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये संच वाटपाकरीता दि.१४.०६.२०१९ पासून एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली.**
३. **शासनाच्या दि.१५.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये माहे जून २०१९ करीता १,८५,०००, माहे जुलै २०१९ करीता २,६८,१४० व माहे ऑगस्ट २०१९**

करीता २,४९,५९० अतिरिक्त सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपास मान्यता प्रदान करण्यात आली. शासन मान्यतेनुसार वेळोवळी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले.

४ उपरोक्त पुरवठा आदेश निर्गमित करण्यापूर्वी नियुक्त पुरवठादार संस्थेसोबत वेळोवेळी करारनामा करण्यात आला.

५. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना दि. ०२.०९.२०१९ पर्यंत ६६५२६३ सुरक्षा संच व ६६५१६४ अत्यावश्यक संच वाटप करण्यात आले. (जिल्हा निहाय वाटपाचा तपशील सोबत संलग्न)

६. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाकरीता शासनाच्या दि.०९.०८.२०१९ च्या पत्रान्वये दि.३१.०८.२०१९ पर्यंत देण्यात आलेली मुदत शासनाच्या दि.३१.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये दि.१५.०९.२०१९ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत करण्यात आलेल्या उपरोक्त कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

## बांधकाम कामगार, दि.०२.०९.२०१९ अखेर सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप बांधकाम कामगारांची संख्या दर्शविणारे प्रपत्र

| अ.क्र. | जिल्हा | दि.०२.०९.२०१९ पर्यंत अत्यावश्यक संच वाटप कामगारांची संख्या | दि.०२.०९.२०१९ पर्यंत सुरक्षा संच वाटप कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| | मुंबई शहर | १६०१४ | १६००३ |
| | मुंबई उपनगर पूर्व | ४८६६ | ४८६६ |
| | मुंबई उपनगर पश्चिम | ८२०६ | ८२०६ |
| | ठाणे | २२०० | २२०० |
| | पालघर | ६८६४ | ६८६४ |
| | कल्याण | ३२३९ | ३२३९ |
| | भिवंडी | १६१ | १६१ |
| | रायगड | ११११४ | ११११४ |
| | सिंधुदुर्ग | ६११२ | ६११२ |
| | रत्नागिरी | ३४७८ | ३४७८ |
| | पुणे | २१९०५ | २१९०३ |
| | सांगली | ४६१२ | ४६१० |
| | सातारा | ५४९८ | ५४९८ |
| | सोलापूर | २१२२० | २१२२० |
| | बार्शी | ३५३२ | ३५३२ |
| | कोल्हापूर | १५४६८ | १५४६८ |
| | इचलकरंजी | ९६४५ | ९६४५ |
| | नाशिक | १७०४२ | १७०४२ |
| | मालेगांव | ५५७४ | ५५७४ |
| | जळगांव | १३२५० | १३२५१ |
| | अहमदनगर | १६५५१ | १६५५१ |
| | धुळे | ८५७३ | ८५७३ |
| | नंदूरबार | ७८१४ | ७८१४ |
| | औरंगाबाद | १५८९३ | १५८९३ |
| | लातूर | २४०२७ | २४०२१ |
| | नांदेड | ५९०६ | ५९०४ |
| | बीड | २५६३९ | २५६३९ |
| | परभणी | १८३५६ | १८३५६ |
| | उस्मानाबाद | ५७०० | ५६९९ |
| | हिंगोली | १३०७३ | १३०७३ |
| | जालना | ७१५८ | ७१५८ |
| | नागपूर | ६५८२७ | ६५८१० |
| | अमरावती | ३०४११ | ३०४०० |
| | भंडारा | ५८६०६ | ५८५४४ |
| | गोंदिया | १०१०३ | १०१०१ |
| | चंद्रपूर | ४८५३८ | ४८५३४ |
| | अकोला | १०४११ | १०४१२ |

| अ.क्र. | जिल्हा | दि.०२.०९.२०१९ पर्यंत अत्यावश्यक संच वाटप कामगारांची संख्या | दि.०२.०९.२०१९ पर्यंत सुरक्षा संच वाटप कामगारांची संख्या |
|---|---|---|---|
| | वाशिम | २५७४ | २५७४ |
| | वर्धा | ३८२४२ | ३८२४७ |
| | गडचिरोली | ११२३१ | ११०२५ |
| | बुलढाणा | ४८६१ | ४७११ |
| | यवतमाळ | ५७८६१ | ५८१६४ |
| एकूण | | ६६५२६३ | ६६५२६४ |

**विषय क्र.०८ :- मावळ तालुक्यात तळेगाव जि. पुणे येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे कार्यालय सुरु करण्याबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. राज्यमंत्री, कामगार, पर्यावरण, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१६.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मावळ तालुक्यात मोठया प्रमाणात नवीन इमारत बांधकामे व प्रकल्प होत असून मोठया प्रमाणात बांधकाम कामगार कार्यरत आहेत. परिसरासतील बांधकामाची संख्या लक्षात घेता मंडळाचे केंद्र सुरू करणेविषयी मोठया प्रमाणात मागणी होत असल्याचे नमूद करून तळेगांव जि. पुणे येथे मंडळाचे केंद्र स्थापित करुन कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांना कळविण्यात आले आहे. (प्रत संलग्न)

याबाबत, उद्योग, उर्जा व कामगार विभाग कामगार-०७ यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र.८१/काम-७ दि.२५ जुले २०१९ रोजीच्या पत्रान्वये स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

पुणे जिल्हयात माहे ऑगस्ट २०१९ पर्यंत नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या १,७३,३४५आहे. नोंदीत बांधकाम कामगारांपैकी ५३०२२ बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय (जिवीत) आहे.

सद्यस्थितीत राज्यात ४२ ठिकाणी जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. (यादी सोबत संलग्न) भविष्यात पुणे जिल्हयामध्ये पुणे विभागाचे विभागीय कार्यालय व पुणे जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे याशिवाय पुणे शहरालगत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. सबब, पुणे जिल्हयात बांधकाम कामगारांकरीता ०२ जिल्हा कामगार सुविधा केंद्र व पर्यवेक्षणाकरीता विभागीय कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे.

पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यात तळेगांव येथे मंडळाचे स्वतंत्र जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करावे किंवा कसे? याबाबत प्रस्ताव मंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे. सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती मंडळाचे जिल्हा कामगार सुविधा केंद्र मावळ तालुक्यातील तळेगांव येथे स्थापन करावे, असा निर्णय घेण्यात व सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(८)/२०१९ :- मंडळ स्तरावरून ४२ ठिकाणी स्थापन करण्यात येणाऱ्या जिल्हा कामगार सुविधा केंद्रासोबत पुणे जिल्हयातील मावळ तालुक्यात तळेगांव येथे मंडळाचे स्वतंत्र जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात यावे, त्याकरीता योग्य त्या जागेची निवड करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०९ :- कामगार आयुक्तालय, विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयाकरिता वाहन खरेदी बाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, कामगार उप आयुक्त, प्रशासन, कामगार आयुक्त कार्यालय, यांचे पत्र क्र. आस्था/वाहन/वि.का./२०१९/काया-०३/१०४० दि.१४.०८.२०१९ अन्वये मंडळाच्या कामकाजासाठी कामगार आयुक्तलयाच्या विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालयांना वाहन उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केलेली आहे. (प्रत संलग्न)

इमारत व इतर बांधकाम कामगार (सेवाशर्तींचे नियमन व कल्याण) अधिनियम १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. सदर मंडळाची स्थापना झाल्यापासून या मंडळातील विभागीय व जिल्हा स्तरावरील सर्व कामकाज कामगार कार्यालयांतर्गत अधिकारी व कर्मचारी करत आहेत. सद्यस्थितीत दिवसेंदिवस मंडळाच्या कामकाजाचा व्याप वाढत आहे.

कामगार आयुक्त कार्यालयाचे मुख्य कामकाज हे औद्योगिक शांतता राखणे व विविध कामगार कायद्यांची अंमलबजावणी करणे हे आहे. यामध्ये २६ कामगार कायदयांचा समावेश होतो. तसेच, असंघटीत आयुक्तालयाचे कामकाजही या कामगार कार्यालयांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत केले जाते.

मंडळाचे कामकाज हे जिल्हयांच्या शहरी भागांपासून ग्रामीण भागांपर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवर जावून काम करावे लागते. यामध्ये विविध ठिकाणी कामगार नोंदणी व लाभ वाटपाचे कॅम्प आयोजित करावे लागतात. कामगार कार्यालये ही जिल्हयांच्या मुख्यालयात असल्याने जिल्हयाच्या ठिकाणावरुन गाव व तालुका पातळीवर कामगारांपर्यंत पोहचणे वाहनाअभावी शक्य होत नाही. जिल्हा कार्यालयांना मंडळाची वाहने नसल्याने मंडळाचे कामकाज करताना अडचणी निर्माण होत आहेत. तसेच, वाहनांअभावी मंडळाचे कामकाज सुलभरीत्या पार पाडणे कठीण झालेले आहे. अशा परिस्थितीत मंडळाने जिल्हा कार्यालयांना वाहने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तसेच, जिल्हा स्तरावर मंडळाचे कामकाज सनियंत्रण विभागीय स्तरावरील कार्यालयाकडून केले जाते. विभागीय कार्यालयांना सुध्दा मंडळाचे वाहन नसल्याने जिल्हास्तरावर जावून कामकाज करताना अडचणी निर्माण होत आहे. सबब, प्रत्येक विभागीय कार्यालयास मंडळाने वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत कोकण विभाग, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या ०५ ठिकाणी विभागीय कार्यालये असून अमरावती विभागासाठी विभागीय कार्यालय लवकरच सुरू होत आहे. तसेच, कामगार आयुक्त कार्यालयाची जिल्हास्तरावर ३८ कार्यालये आहेत. सबब, बांधकाम मंडळाचे कामकाज सुरूळीत चालण्याच्या दृष्टीने ०६ विभागीय कार्यालये व ३८ जिल्हा कार्यालये अशा एकूण ४४ कार्यालयांना बोलेरो (Bolero) हे वाहन उपलब्ध करून देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वाहन २०१४/प्र.क्र.९/१४/ विनियम दि.०८.०५.२०१४, दि.०४.०८.२०१४ व दि.०७.०८.२०१४ अन्वये " वाहन आढावा समितीच्या मान्यतेने वाहन अनुज्ञेय असलेल्या अधिका-यांना खालीलप्रमाणे वाहन- जीप, किंमत मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | तालुका स्तर/ उपविभाग स्तर/ जिल्हा स्तर | अनुज्ञेय वाहन-जीप, किंमत मर्यादा रू.६.०० लक्ष | |
| ब. | विभाग स्तर | अ) | पोलीस महानिरीक्षक व विभागीय आयुक्त- कार किंमत मर्यादा रू.८.०० लक्ष |
| | | ब) | जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी- कार किंमत मर्यादा रू.७.०० लक्ष |
| | | क) | अन्य अधिकारी- कार/जीप किंमत मर्यादा रू.६.०० लक्ष |

उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने Gem पोर्टलवर उपलब्ध दरानुसार महिंद्रा बोलेरो वाहन खरेदी व अनुषंगिक खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ. वाहन खरेदीचा खर्च

| अ.क्र. | बाब | प्रतिवाहन खर्च रक्कम रू. | ४४ वाहन खरेदीवरील खर्च |
|---|---|---|---|
| १. | वाहन किंमत | ६८६२५०/- | ३,५१,४०,७७६/- |
| २. | वाहन नोंदणी शुल्क | १०६८७५/- | ४७,०२,५००/- |
| ३. | विमा | ६२३६९/- | २७,४४,२३६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आवश्यक सुटे भाग | ९१५४/- | ४,०२,७७६/ |
| | **एकूण** | ९७७०५४/- | ४,२९,९०,२८८/- |

ब. नियमित खर्च

| अ.क्र. | बाब | दरमहा खर्च | वार्षिक खर्च रू. | ४४ वाहनांवरील वार्षिक खर्च रू. |
|---|---|---|---|---|
| १. | वाहनचालक | २०,०००/-प्रति वाहनचालक | २,४०,०००/- | १,०५,६०,०००/- |
| २. | इंधन, तेल व वंगण | १९,२००/- (२४०० कि.मी.@ रू.८०/-) | २,३०,४००/- | १,०१,३७,६००/- |
| | | **एकूण** | **४,७०,४००/-** | **२,०६,९७,६००/-** |

प्रस्तावित ४४ वाहनांवरील अपेक्षित खर्च रू.४,२९,९०,२८८/ व वाहन चालक, इंधन, तेल व वंगण यावरील वार्षिक खर्च रू.२,०६,९७,६००/- एवढा राहील. याशिवाय ०१ वर्षानंतर वाहन देखभालीवरील खर्च करावा लागेल.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.शापसे-३४१९/प्र.क्र.०३/का.३१ दि.३०.०५.२०१९ अन्वये शासकीय परिवहन सेवा, वरळी मुंबई यांच्याकडून मुंबईस भेट देणाऱ्या सन्मानीय अतिथीच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय वाहने उपलब्ध नसताना खाजगी पुरवठादारांकडून भाडयाने वाहने उपलब्ध करून घेण्यासाठी मंजूर दराचा तपशील शासन आदेशासोबत प्रपत्रात नमूद करण्यात आला आहे.(प्रत संलग्न) सदर प्रपत्रात प्रस्तावित बोलेरो वाहनाचे दर निश्चित करण्यात आलेले नाही. सदर दराच्या आधारे बोलेरो किंवा समकक्ष वाहनाकरीता प्रति वाहन प्रति माह रू.५०,०००/- एवढा खर्च गृहीत धरून खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित राहील.

| अ. क्र. | तपशील | प्रति वाहन प्रति माह अंदाजित खर्च | ४४ वाहनांकरीता प्रति माह खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | बोलेरो/ समकक्ष वाहन | ५०,०००/- | २२,००,०००/- | २,६४,००,०००/- |

प्रस्तावित ४४ बोलेरो वाहने खरेदी करणे अथवा बोलेरो किंवा समकक्ष वाहन मासिक भाडेतत्वावर घेणे याबाबत प्रस्ताव मंडळाच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांनी, कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत कार्यरत ४४ जिल्हा कार्यालयांकरीता वाहन खरेदी करण्याऐवजी ज्या जिल्हा/ विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत त्या जिल्हयांकरीता मासिक भाडेतत्वावर वाहन घेण्यात यावे असे सूचित केलेले आहे. सदर सूचनेस सर्व सन्माननीय सदस्यांनी सहमती दर्शविली व सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(९)/२०१९:- कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत ४४ जिल्हा कार्यालयांपैकी ज्या जिल्हा/ विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत त्या अधिकाऱ्यांना मंडळाच्या कामकाजासाठी बोलेरो/ स्कॉर्पियो अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे ज्या अधिकाऱ्याकडे एका पेक्षा जास्त पदांचा कार्यभार देण्यात आलेला आहे त्या अधिकाऱ्यांना कार्यभार सुपूर्द केलेल्या जिल्हयातही सदर वाहनांचा वापर करण्यास मुभा राहील. जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांनी निश्चित केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अप्पर कामगार आयुक्त/ कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेने मासिक भाडयाचे दर व धाव निश्चित करून प्रथम ०१ वर्षाकरीता जिल्हा स्तरावरून करारनामा करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१० :- रॉयल एक्झाटिका, एस. व्ही.जी बिल्डर्स यांचे बांधकाम प्रकल्पावर कोंढवा बु. ता. हवेली जि. पुणे दि. २९. ०६. २०१९ रोजीची दुर्घटनेच्या मृत्यू पावलेल्या अनोंदित बांधकाम कामगारांच्या वारसांना विशेष बाब स्वरुपात अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, उपरोक्त विषयी अप्पर कामगार आयुक्त,पुणे कार्यालयाच्या दि.२९.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कोंढवा बु. ता. हवेली जि. पुणे येथे आज दि.२९.०६.२०१९ रोजी अल्कॉन स्टायलस या सोसायटीची खेटून असणाऱ्या मे. रॉयल एक्झाटिका या बांधकाम प्रकल्पावरील पत्राशेड मधील ११ कामगार व ०४ लहान मुले असे एकूण १५ लोक मयत झाले आहेत. या मयत कामगारांना मे. एस.व्ही जी बिल्डर्स व कुणाल हौसिंग या बांधकाम व्यवसायिक यांनी अल्कॉन स्टायलस या सोसायटीच्या बाजुला सुरु असलेल्या बांधकामासाठी आणलेले होते. सदर मृत कामगारांची मंडळांतर्गत नोंदणी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर मृत कामगारांच्या कायदेशीर वारसास कोणतेही आर्थिक लाभ मिळू शकणार नसल्याचे सदर अहवालात नमूद केले आहे. मा. मंत्री महोदय, कामगार विभाग व मा. राज्यमंत्री महोदय कामगार विभाग यांनी सदर दुर्घटनेमध्ये १५ मृत बांधकाम कामगारांना मंडळांतर्गत त्यांच्या कायदेशीर वारसास रू.५.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर पत्रान्वये अर्थसहाय्य देण्याबाबत मंडळास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

अप्पर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयामार्फत प्राप्त पत्रास अनुसरून मंडळामार्फत दि.२९.०६.२०१९ रोजी प्रस्तावित केल्याप्रमाणे ११ मयत बांधकाम कामगारांच्या कायदेशीर वारसास रू.५.०० लक्ष प्रमाणे अर्थसहाय्य अदा करण्यास विशेष बाब म्हणून शासन मान्यता प्रदान करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दि.२९.०६.२०१९ रोजीच्या प्रस्तावास अनुसरून शासनाने दि.०४.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सर्व मृत पावलेल्या बांधकाम कामगारांच्या कायदेशीर वारसदारास विशेष बाब म्हणून मंडळाच्या निधीतून ०५.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली होती. (प्रत संलग्न) शासन मान्यतेस अनुसरून ११ मृत बांधकाम कामगारांच्या कायदेशीर वारसास ५.०० लक्ष अर्थसहाय्य अदा करण्याकरीता अप्पर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयास दि.०९.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि, अप्पर कामगार आयुक्त, पुणे कार्यालयाच्या दि.३१.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कटीहार (बिहार) यांनी त्यांच्या दि.२३.०७.२०१९ च्या पत्रान्वये ०८ कामगारांच्या "आश्रित" यांचा बँक तपशील पाठविला असून ते कायदेशीर वारस असल्याचे नमूद केलेले नाही अथवा कायदेशीर वारसदार असल्याबाबतचा पुरावा दिलेला नसल्याचे नमूद केलेले आहे. तसेच त्यांनी पत्रात नमूद केलेले आश्रित हे संबधित मृत कामगारांचे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत, याची खात्री उपलब्ध कागदपत्रांवरून होत नसल्याचे नमूद आहे.

मंडळाच्या दि.०१.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मा. कामगार आयुक्त, बिहार राज्य यांना ११ मृत बांधकाम कामगारांना वारसांच्या बँक खात्याचा तपशील सादर करण्यास विनंती करण्यात आली आहे. मा. कामगार आयुक्त बिहार राज्य यांच्याकडून प्राप्त तपशिलानुसार प्रति मृत कामगार रू.५.०० लक्ष अर्थसहाय्य वितरीत करण्यात येईल. त्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. सदर विषयावर चर्चा करताना प्रस्तावित ११ मृत पावलेल्या अनोंदीत बांधकाम कामगारांच्या वारसांना विशेष बाब स्वरूपात प्रत्येकी रू.५.०० लक्ष याप्रमाणे अर्थसहाय्य देण्यास सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली. मा. कामगार आयुक्त यांनी असे सुचित केले की, अशाच प्रकारची घटना पुणे येथील बहुददेशीय हॉलचा लिंटेल बीम व स्लॅब भरणेकरीता सेंट्रींगचे काम चालू असता दोन कामगार तिसऱ्या मजल्यावरून पडून मयत झाले घडली व सदर घटनेत ०२ अनोंदीत बांधकाम कामगारांचा अपघाती मृत्यू झालेला आहे. त्यांच्या वारसांना रू.५.०० लक्ष एवढे अर्थसहाय्य मंजूर करावे. सदर सूचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव क्र. ५२(१०)/२०१९ :- रॉयल एक्झाटिका, एस. व्ही.जी बिल्डर्स यांचे बांधकाम प्रकल्पावर कोंढवा बु. ता. हवेली जि. पुणे दि. २९. ०६. २०१९ रोजीची दुर्घटनेच्या मृत्यू पावलेल्या ११ अनोंदित बांधकाम कामगारांच्या वारसांना विशेष बाब स्वरुपात प्रत्येकी रू.५.०० लक्ष प्रमाणे अर्थसहाय्य देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच पुणे महानगरपालिकेच्या कै. ह.तु. थोरवे शाळा क्र. १६२ बी कात्रज येथील शाळेच्या तिसऱ्या मजला,पुणे येथील बहुददेशीय हॉलचा लिंटेल बीम व स्लॅब भरणेकरीता सेंट्रींगचे काम चालू असता दोन कामगार तिसऱ्या मजल्यावरून पडून मयत झाले सदर दोन बांधकाम अनोंदीत बांधकाम कामगारांच्या वारसांनाही विशेष बाब स्वरूपात रू.५.०० लक्ष**

प्रमाणे अर्थसहाय्य देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, सदर दोन अनोंदीत बांधकाम कामगारांच्या वारसांना विशेष बाब स्वरूपात रू.५.०० लक्ष प्रमाणे मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी.असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.११ :- मे. एमएमटीसी लिमिटेड, बीकेसी यांच्या मालकीच्या इमारतीतील तळ माळ्यावरील अंदाजे १४०० स्क्वेअर फुट- कारपेट जागा तात्पुरत्या स्वरुपात (मंडळ मुख्यालयाचे त्याच इमारतीतील ५ व्या मजल्यावरील कार्यालय तयार होईपर्यंत) भाडे तत्वावर घेण्याबाबत.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मुख्यालय कामगार भवन, बीकेसी मुंबई येथील इमारतीत चौथ्या माळयावर कार्यरत होते. चौथ्या माळ्यावरील दालनाच्या व सभागृहाच्या नूतनीकरणाचे/दुरूस्तीचे कामकाज सुरू करण्यात आल्याने मंडळाचे मुख्यालय तात्पुरत्या कालावधीसाठी अन्यत्र स्थालांतरित करणे आवश्यक होते.

मंडळाच्या ठराव क्र. ५१ (७)/२०१९ अनुसार मंडळ मुख्यालयासाठी मे. एमएमटीसी लिमिटेड यांच्या बीकेसी येथील इमारतीतील ५ व्या माळयावरील सुमारे ४४४८ चौ.फुट जागा ५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेण्यात आली आहे. त्यासंदर्भातील रितसर करारनामादेखील दि.०३.०७.२०१९ रोजी करण्यात आला आहे. वर नमुद केल्याप्रमाणे कामगार भवनातील चौथ्या माळ्यावरील मंडळाचे मुख्यालय तात्पुरत्या कालावधीसाठी अन्यत्र स्थलांतरित करण्याची गरज विचारात घेता, मे. एमएमटीसी लिमिटेड यांच्याकडे त्याच्या बीकेसीमधीलच मालकीच्या इमारतीत तात्पुरत्या स्वरूपात, तीन महिन्यांच्या अथवा मंडळ मुख्यालयाचे ५ व्या माळ्यावरील कामकाज पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी, जागा उपलब्धतेबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार, मे. एमएमटीसी लिमिटेड यांनी तळमाळयावरील १३७८.३६ चौ.फुट कारपेट एवढी जागा, ५ व्या माळयावरील जागा उपलब्ध करून देताना दि.०३.०७.२०१९ रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून व त्याच दराने (रु.२८१.५० प्रति चौ.फुट कारपेट) मंडळ मुख्यालय तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यासाठी, उपलब्ध करून दिली आहे. ही जागा दि.०९.०८.२०१९ पासून उपलब्ध करून देताना एकुण भाडे रू.३,८८,००८/- प्रति माह + जीएसटी एवढे आकारण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुरक्षा अनामत ठेव रक्कम आकारण्यात आलेली नाही.

दि.०९.०८.२०१९ पासून मंडळ मुख्यालयाचे कार्यालय एमएमटीसीच्या तळमजल्यावरील जागेत कार्यान्वित झालेले आहे. यासाठी येणाऱ्या भाडयाची रक्कम रू.३,८८,००८/- प्रति माह + जीएसटीची अशा येणाऱ्या खर्चास कृपया मंडळाची मान्यता

मिळावी, असा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५२(११)/२०१९ :- मे. एमएमटीसी लिमिटेड, बीकेसी यांच्या मालकीच्या इमारतीतील तळ माळयावरील अंदाजे १४०० स्क्वेअर फुट- कारपेट जागा तात्पुरत्या स्वरुपात (मंडळ मुख्यालयाचे त्याच इमारतीतील ५ व्या मजल्यावरील कार्यालय तयार होईपर्यंत) भाडे तत्वावर घेण्याकरीता व दरमहा भाडयाची रक्कम रू.३,८८,००८/- अधिक वस्तू व सेवा कर मे. एमएमटीसी यांना अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१२ :- मे. कॅस्कॉम इन्फो सोल्यूशन, नाशिक यांच्या नियुक्तीला मंडळाच्या संकेतस्थळाच्या देखभालीसाठी १ वर्षाची मुदतवाढ देण्याकरिता**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि. १८.०७.२०१८ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. १० अन्वये मंडळाच्या www.mahabocw.in या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती करीता सदर क्षेत्रातील तज्ञ व्यवस्थापन कंपनीची प्रथम एक वर्षासाठी नियुक्ती करणे व दरवर्षी मुदतवाढ अथवा नवीन संस्था निश्चित करणेबाबत व वार्षिक अंदाजित रु. २.९५ लक्ष खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

त्याअनुषंगाने मे. कॅस्कॉम इन्फो सोल्यूशन्स, मुंबई यांची दि. २६.०७.२०१८ ते २५.०७.२०१९ या कालावधीसाठी प्रथम एक वर्षासाठी मंडळाचे संकेत स्थळाच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी वार्षिक अंदाजित रु.२.९५ लक्ष एवढया खर्चासह नियुक्ती करण्यात आली होती.त्यानुसार सदर कंपनीने मंडळाच्या संकेतस्थळाची देखभाल, दुरुस्ती व त्यावरील माहिती अद्यायावत करण्याबाबतचे कामकाज नियमीत पुर्ण केले आहे.

मे. कॅस्कॉम इन्फो सोल्यूशन्स, मुंबई यांची सदर कामकाजासाठीची मुदत दि. २५.०७.२०१९ रोजी संपुष्टात आलेली असुन त्यांनी त्यांच्या दि. ३०.०७.२०१९ च्या पत्रान्वये मंडळाच्या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभालीसाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार मंडळाच्या www.mahabocw.in या संकेतस्थळाची नियमित देखभाल व दुरुस्ती करणे तसेच त्यावरील माहिती अद्यावत करण्याकरीता सदर क्षेत्रातील तज्ञ व्यवस्थापन कंपनीची नेमणूक करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मे. कॅस्कॉम इन्फो सोल्यूशन्स, मुंबई यांना दि. २६.०७.२०१९ पासून पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. ५२(१२)/२०१९ :- मे. कॅस्कॉम इन्फो सोल्युशन, नाशिक यांच्या मंडळाच्या संकेतस्थळाच्या वार्षिक देखभालीसाठीच्या नियुक्तीस रु.२.९५ लक्ष या मंजूर दराने पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१३ :- राज्यशासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा नियम मंडळाच्या अधिपत्याखालील पदांना लागू करण्याबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१७ रोजी झालेल्या ४२ व्या बैठकीतील ठराव क्र. ११ द्वारे मंडळाच्या आस्थापनेवरील एकूण १९ संवर्गातील ४१९ पदांच्या आकृतीबंधास मंडळाने मंजुरी दिली होती. तदनंतर मंडळाच्या दि.०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीत सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) १ पद, सिस्टीम ॲनालिस्ट १ पद व आरोग्य/वैद्यकीय अधिकारी १ पद याप्रमाणे ३ संवर्गातील एकुण ३ पदांचा वाढीव आकृतीबंध मंडळाच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात आला होता. त्यानुसार मंडळाने ठराव क्र. ५१ (१५-२) अन्वये एकूण २२ संवर्गातील ४२२ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी दिली आहे.

मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येणाऱ्या पदांवर नियुक्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या रजा, वेतन, शिस्तभंग विषयक प्रकरणातील कार्यवाही इत्यादी आस्थापना व सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी विहित नियमांची मंडळास आवश्यकता भासणार आहे. तसेच मंडळाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेल्या पदांना राज्य शासनाने सातव्या वेतन आयोगानुसार लागू केलेल्या संबंधित वेतनश्रेण्या लागू करणास मंडळाच्या दि.०३.०६.२०१९ रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीत ठराव क्र.५१ (१५-२) अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता, राज्य शासकीय पदांना लागू असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा नियमांपैकी खालील महाराष्ट्र नागरी सेवा नियम मंडळाच्या आस्थापनेवरील पदांना लागू केल्यास प्रशासकीय दृष्टया सोयीचे होईल असे वाटते:-

१. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१
२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१
३. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन ) नियम, १९८१
४. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने ) नियम, १९८१
५. महाराष्ट्र नागरी सेवा ( वर्तणुक) नियम, १९७९
६. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९
७. विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१

वरीलप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या व यापुढे होणाऱ्या सुधारणांसह व बदलांसह तसेच सदर नियमातील मंडळाच्या आस्थापनेवरील पदांना गैरलागू असणारे विवक्षित नियम किंवा नियमाचा भाग वगळण्याचे किंवा मंडळास

अनुरूप फेरफार करण्याचे शासनास/मंडळास अधिकार राहतील, या अटीसह उपरोक्त महाराष्ट्र नागरी सेवा नियम मंडळाच्या आस्थापनेवरील पदांना लागू करण्यास मंडळाने कृपया मान्यता दयावी. मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येईल असा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सर्वानुमते ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र. ५२(१३)/२०१९ :- महाराष्ट्र नागरी सेवा नियम त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या व यापुढे होणाऱ्या सुधारणांसह व बदलांसह तसेच सदर नियमातील मंडळाच्या आस्थापनेवरील पदांना गैरलागू असणारे विवक्षित नियम किंवा नियमाचा भाग वगळण्याचे किंवा मंडळास अनुरूप फेरफार करण्याचे शासनास/मंडळास अधिकार राहतील, या अटीसह उपरोक्त महाराष्ट्र नागरी सेवा नियम मंडळाच्या आस्थापनेवरील पदांना लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१४ :- मंडळाचे वार्षिक लेखे व विवरण पत्राच्या नमुन्यास मान्यता देणेबाबत.**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील नियम २७ अन्वये मंडळाच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचे लेखा व लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी विधीमंडळात ठेवण्यासाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

या नियमातील नियम २७ (१) अनुसार मंडळाने प्रत्येक वित्तीय वर्षात लेखे योग्यरित्या ठेवणे तसेच लेखा व लेखाविषयीची विवरणपत्रांचा नमुना शासन व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्याने विहित करणे आवश्यक आहे.

मंडळाचे सन २००७-०८ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षांचे लेखे तयार करण्यात आले असून त्यांस मंडळाने मान्यता दिली आहे. सन २००७-०८ ते २०१५-१६ या कालावधीचे लेख्यांचे संव्यवहार लेखापरीक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून पुर्ण करण्यात आलेले आहे. मंडळाचे सन २०१६-१७ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षांचे लेख्यांचे संव्यवहार लेखापरीक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून माहे जुलै २०१९ मध्ये करण्यात आले आहे.

सन २०१२-१३ ते २०१५-१६ च्या लेख्यांचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरिक्षण अहवालात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील नियम २७ (१) अनुसार मंडळाने प्रत्येक वित्तिय वर्षात लेखे योग्यरित्या ठेवणे आवश्यक आहे, तसेच लेखा व लेखाविषयीची विवरणपत्रांचा नमुना शासन व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्याने विहित करणे आवश्यक असतांना तो विहित करून घेण्यात आलेला नाही असे अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळाकडून लेखा व लेखाविषयीची विवरणपत्रांचा नमुना निश्चीत करणे आवश्यक आहे. मंडळाचे सन २००७-०८ ते २०१७-१८ या कालावधीचे वार्षिक लेखे एकाच नमुन्यात तयार करण्यात आलेले आहेत. याबाबत मंडळाचे सन २०१६-१७ ते २०१७-१८ चे लेखे तयार करणारे मे. के. एस. संघवी अँड कंपनी यांच्याकडून लेखे व लेख्यांची विवरणपत्रे यांचा नमुना तयार करून घेण्यात आला. **INCOME AND EXPENDITURE_A/C** व **BALANCE SHEET** चा नमुना सोबत जोडला असून त्यास भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांची मान्यता घेण्यासाठी शासनास सादर करण्यापूर्वी त्यास मंडळाची मान्यता घेण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

मंडळाच्या मान्यतेनंतर लेखे व लेख्यांच्या विवरणपत्रांचा नमुना शासनामार्फत महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेस सादर करण्यात येईल.

**ठराव क्र. ५२(१४)/२०१९ :- मंडळाचे वार्षिक लेखे व विवरण पत्राच्या नमुन्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेनंतर लेखे व लेख्यांच्या विवरणपत्रांचा नमुना महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेस सादर करण्यासाठी शासनास विनंती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**MAHARASHTRA BUILDING & OTHER CONSTRUCTION WORKERS WELFARE BOARD**

**BALANCE SHEET AS ON 31ST MARCH, ________**

| | SCH NO. | CURRENT YEAR As on 31st March ___ ( Rs.) | PREVIOUS YEAR As on 31st March ___ ( Rs.) |
|---|---|---|---|
| **SOURCES OF FUNDS:** | | | |
| **Funds** | | | |
| **Workers Welfare fund** | | | |
| Add: Excess of Income over Exp. | | | |
| Less: Excess of Exp. Over Income | | | |
| **Other Funds (specify)** | | | |
| | | | |
| Reserves | | | |
| | | | |
| **Loans** | | | |
| Government | | | |
| Others | | | |
| | | | |
| **Current Liabilities and provisions** | B | | |
| | | | |
| | | | |
| **TOTAL** | | | |
| **APPLICATION OF FUNDS** | | | |
| **Fixed Assets** | | | |
| Gross Block at cost | | | |
| Less: Cummulative dep | | | |
| Net Block | | | |
| | | | |
| Capital Work in progress | | | |
| | | | |
| **Investments and deposits** | | | |
| Investment | G | | |
| Deposits | | | |
| | C | | |
| | | | |
| **CURRENT ASSETS, LOANS AND ADVANCES** | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| **CURRENT ASSETS** | | | |
| Bank Balances | D | | |
| Cash on Hand | | | |
| Interest Receivable on FD with Banks | E | | |
| Schemes Accounts | F | | |
| Cess Receivable A/c | | | |
| Receivable on acc of Bounced chq | | | |
| | | | |
| **Loans and Advances** | | | |
| | | | |
| **TOTAL** | | | |

Chairperson (Signature)
Member(s) (Signature)
Secretary (Signature)
Officer-In-Charge (Finance and Accounts)

**विषय क्र.१५ :- मंडळाकडे जमा उपकर निधीच्या गुंतवणुकीचा त्रैमासिक अहवाल सादर करणेबाबत**

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर कल्याणकारी मंडळाच्या दि. ०३.०६.२०१९ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीमध्ये माहे मे, २०१९ पर्यंतची मंडळाने केलेल्या रक्कम रु. ८३९० कोटी मुदत ठेव गुंतवणूकीचा गोषवारा सादर करण्यात आला होता व सदर गोषवाऱ्यातील गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासन वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार गुंतवणूकीचा माहे एप्रिल २०१९ ते जून २०१९ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल दि. ५ ऑगस्ट २०१९ रोजी प्रशासकीय विभागास सादर करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने माहे ऑगस्ट, २०१९ अखेर केलेल्या जमा उपकर रक्कमेच्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रु.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे. | गुंतवणूकीच्या परिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंध्रा बँक, खार पश्चिम, मुंबई | ११३९१२०१०००८४७६२ Recipt No. १५६१२४ | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | १००० | ७.४० | १०७६.०७ |
| २ | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००IJR०००००९१८ Recipt No. ०५६४०० | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | ३९० | ७.४० | ४१९.६७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | इंडियन ओव्हरसीस बँक वांन्द्रा (प) | १२८०४०००००७१४८<br>Recipt No.<br>NDRR०८३३३८४ | १९.०९.२०१९ | १९.०९.२०२० | १००० | ७.५१ | १०७७.२४ |
| ४ | कॅनरा बँक, ओव्हरसीस मेन ब्रॅन्च, मुंबई | १५८९४०१००१६११<br>Recipt<br>No.KK३८४३८३ | २४.०९.२०१९ | २४.०९.२०२० | १००० | ७.६० | १०७८.११ |
| ५. | बँक ऑफ बडोदा, वांद्रा (पूर्व), मुंबई | २१०४०६०००३१३१९ | २६.०४.२०१९ | २६.०४.२०२० | ६५० | ७.४० | ६९९.४५ |
| ६. | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००UR०००००१<br>१८<br>Recipt No. ०५६४०० | ०८.०५.२०१९ | ०८.०५.२०२० | ६२० | ७.४६ | ६६६.७१ |
| ७. | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले, मुंबई | ६६३०६८४३६५<br>TDR NO.<br>०५२६५५३ | ०८.०५.२०१९ | ०८.०५.२०२० | ३९० | ७.४६ | ४१९.११ |
| ८. | कॉर्पोरेशन बँक, वांद्रा (प), मुंबई | ५३०४०२०३६११८५५<br>२<br>Recipt No. २७०११४ | १५.०५.२०१९ | १५.०५.२०२० | १००० | ७.५१ | १०७७.२४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | बँक ऑफ बडोदा, (ई-विजया बँक) बांद्रा (प), मुंबई | ५००२१६६४०००००१ Recipt No. ०६१७७ | २२.०५.२०१९ | २२.०५.२०२० | ३५० | ७.३५ | ३७६.४४ |
| १०. | सिंडीकेट बँक, मरोल ब्रॅन्च, मुंबई अंधेरी (पु) मुंबई | ५०३२५११००००००५/१ Recipt No. SBN ९६२०९० | २२.०५.२०१९ | २२.०५.२०२० | ५५० | ७.३५ | ५९१.५५ |
| ११. | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले, मुंबई | ६७७५२७६३१६ Recipt No. ०८३३७९६ | ०४.०७.२०१९ | ०४.०७.२०२० | ६२० | ७.१० | ६५४.४७ |
| १२. | पंजाब अॅन्ड सिंध बँक, २७/२९ अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट मुंबई | ३८५१४००००७०५६ | ०६.०७.२०१९ | ०६.०७.२०२० | २५० | ६.९८ | २६७.९१ |
| १३. | अलाहाबाद बँक, (२७५५) जी. एन ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, यु. टि. आय हेड क्वार्टर च्या विरुद्ध, बांद्रा (पु), मुंबई | ५०४९७८८२३७१ Recipt No.८७७७७१ | २१.०८.२०१९ | २१.०८.२०२० | १००० | ६.७५ | १०६९.२२ |
| | एकूण | | | | ८६०० | | ९४६४.३५ |

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक महिन्याला मुदत ठेवीच्या रकमा सुरक्षित असून त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज/तारण/ओवर ड्राफ्ट नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित ठेवीदार बँकांकडून घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक ज्या बँकांत करण्यात आलेली आहे त्या बँकाकडुन प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र नियमित प्राप्त करून घेण्यात येतात त्यानुसार माहे ऑगस्ट २०१९ पर्यंतच्या कालावधीत मंडळाच्या आंध्रा बँक, पंजाब नॅशनल बँक, इंडियन ओव्हरसीस बँक, कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा, इंडियन बँक, कॉर्पोरेशन बँक, सिंडीकेट बँक, अलाहाबाद बँक, पंजाब अॅन्ड सिंध बँक या खातेदार बँकांची मुदत ठेव गुंतवणूक सुरक्षित असल्याची प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहे.

मंडळाने माहे ऑगस्ट, २०१९ पर्यंत एकुण रक्कम रू. ८८०० कोटी एवढया जमा निधीची विविध बँकेत केलेल्या गुंतवणुकीचा उपरोक्त गोषवारा मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेअंती सदर गोषवारा शासनास सादर करण्यात येईल.

उपरोक्त विषयाची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेतली. त्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे

**ठराव क्र. ५२(१५)/२०१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपसमितीने माहे ऑगस्ट २०१९ पर्यंत जमा उपकर रक्कम रू. ८८०० कोटी एवढया निधीचा विविध राष्ट्रीयीकृत बँकेत केलेल्या गुंतवणुकीस व गुंतवणूकीच्या सुरक्षेसंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मंडळास सादर करण्यात आली. सदर माहितीची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेवून व उपसमितीच्या स्तरावर घेण्यात आलेल्या गुंतवणूकीच्या निर्णयास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**आयत्या वेळेचा विषय-**

**विषय क्र.०१ :-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भात मालक-कामगार निधी अदा करण्याबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र राज्यातील कामगार कल्याण संवर्धक कार्यांना अर्थसहाय्य देण्याकरिता अशी कार्ये चालविण्यासाठी व विवक्षित प्रयोजनांकरिता महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनिय आमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ४ अन्वये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे आणि कलम ७ अन्वये कल्याण निधीचा विनियोग कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांच्या हितसंवर्धनासाठी राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्या योजना आणि इतर योजना राबविण्यासाठी केला जातो.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना देता येईल मात्र यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांसदर्भातील मालक-कामगार निधी कल्याण मंडळाकडे भरावा लागेल.

मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी दि.०६.०७.२०१८ रोजी नागपूर अधिवेशन काळात नागपूर येथे आणि दि.३१.०७.२०१८ व दि.२१.०१.२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे कामगार विभागाच्या कामकाजाच्या आढावा बैठकीत महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ महाराष्ट्र राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळे, माथाडी मंडळे आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील कर्मचारी, नोंदणीकृत सुरक्षा रक्षक, माथाडी कामगार व बांधकाम कामगार यांना मिळण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.ही वस्तुस्थिती व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत होणारा बांधकाम कामगार याची नाजूक आर्थिक परिस्थिती व महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ व बांधकाम व इतर बांधकाम कामगार (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम १९९६ या अधिनियमांचे हेतू विचारात घेऊन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र.इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांचेकुटुंबीय सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या २६ योजनांचा लाभ

रु.७००/- प्रति वर्षी प्रति जिवित नोंदणीकृत बांधकाम कामगार, महाराष्ट्रात कुठेही लाभ घेऊ शकेल, असे प्रस्तावित केले आहे. मात्र, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास नोंदणीकृत बांधकाम कामगारासाठी, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम ६ बब अनुसार कामगार-मालक अंशदान कल्याण मंडळात भरणा करता येईल काय? या संदर्भातील कायदेशीर बाबी तपासून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व शासन स्तरावरून अंतिम निर्णय घ्यावा, असे प्रभारी कल्याण आयुक्तांनी सुचविलेले आहे. त्यास अनुसरून मंडळाच्या मान्यतेस खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

१. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून त्या त्या ठिकाणी राबविण्यात येत असलेल्या (सोबतचे प्रपत्र) विविध योजनांचा लाभ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित जिवित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांना उपलब्ध करून देण्यात यावा. याकरीता, महाराष्ट्रात कल्याण मंडळामार्फत प्रस्तावित माफक फी प्रति कुटूंब प्रति वर्ष रू.७००/- बाबत विचारविनियम करून फी चे दर ठरविणे प्रस्तावित आहे.
२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांचे अंशदान महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम ६ बबनुसार कामगार कल्याण मंडळास अदा करणेबाबत शासन स्तरावरून निर्णय घेणेबाबत प्रस्तावित केले आहे.

मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र.४९ (०९)/२०१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित जिवित बांधकाम कामगारास व त्यांच्या कुटुंबीयास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडील सद्यस्थितीत सुरू असलेल्या २६ विविध योजना व उपक्रम यांचा लाभ महाराष्ट्रातील कोणत्याही कामगार कल्याण मंडळाच्या केंद्रावर उपलब्ध करून देण्यात यावा. यासाठी त्या कामगाराची महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडील नोंदणी फी घेण्यात येवू नये. कामगार कल्याण मंडळाकडील विविध योजना व उपक्रमाचा लाभ मिळण्यासाठी प्रतिलाभार्थी प्रति वर्ष सवलतीच्या दराची ठोक रक्कम शासनस्तरावरून निश्चित करण्यात यावी. त्यानुसार, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी योजना/उपक्रमांचा प्रत्यक्ष लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार प्रति लाभार्थी ठोक रक्कम कामगार**

**कल्याण मंडळास अदा करण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरुन प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता यविषयी मा. प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४.०३.२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या कामगारांना देखील प्रति कामगार रु. १११/- इतके शुल्क आकारण्यात यावे. त्यामध्ये नोंदणीकृत कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे उपलब्ध् असलेल्या परंतु इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे उपलब्ध नसलेल्या सोयी –सुविधा, योजना, उपक्रम, पुरस्कार, कार्यक्रम इत्यादी बाबी उपलब्ध् करुन देण्यात याव्यात."**

उपरोक्त निर्णयानुरुप कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांसंदर्भातील मालक-कामगार निधी कल्याण मंडळाकडे भरण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे दि.१४.०८.२०११ अखेर नोंदित बांधकाम कामगारांची संख्या १८.७५ लक्ष एवढी असून त्यातील जिवित कामगारांची संख्या ११.९२ लक्ष एवढी आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत कल्याण मंडळाच्या योजनांचा लाभ अनुज्ञेय करण्यासंदर्भात मालक-कामगार निधी मंडळाकडुन अदा करण्यास मान्यता मिळावी. मंडळाकडील सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या संख्येत दररोज होणारा बदल विचारात घेता सद्यस्थितीत मंडळाकडे १० लक्ष नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार कार्यरत आहेत असे गृहीत धरुन प्रति नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय मिळून रु.१११/- या प्रमाणे १० लक्ष नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता एकुण रु. ११.१० कोटी एवढी वर्गणी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडुन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे वर्ग करणे प्रस्तावित आहे.

यथाप्रस्तावित रु. ११.१० कोटी एवढा निधी कामगार कल्याण मंडळाकडे वर्ग करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावित निधी

कामगार कल्याण मंडळाकडे वर्ग करण्यास सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५२(१६)(१)/२०१९ :- मंडळाकडील सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या संख्येत नोंदणी व नुतनीकरणामुळे होणारी वाढ/ घट विचारात घेता सद्यस्थितीत १० लक्ष नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार कार्यरत आहेत असे गृहीत धरुन प्रति नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय मिळून रु.१११/- या प्रमाणे १० लक्ष नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता एकुण रु. ११.१० कोटी एवढी वर्गणी मंडळाकडून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे वर्ग करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई